N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** हिंगोली

**P.S.(ठाणे):** हिंगोली शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0685

**Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/08/2023 21:45

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 07/08/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/08/2023
**Time From (वेळेपासून):** 13:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/08/2023 **Time (वेळ):** 21:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 034

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/08/2023 21:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वन अधिकारी कार्यालय,हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अशोक पंडित चव्हाण

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दक्षतानगर,कारवाडी,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दक्षतानगर,कारवाडी,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8421969356

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरुण भाउसाहेब पवार | | | 1. श्रीकष्णनगर,हिंगोली,हिंगोली शहर,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली
दिनांक:- 08.08.2023

फिर्याद

मी, अशोक पंडीत चव्हाण, वय 29 वर्ष, व्यवसाय नौकरी, वनरक्षक, वनपरीक्षेत्र कार्यालय प्रादेशिक हिंगोली, अंतर्गत बिट येहळेगाव तुकाराम ता. कळमनुरी जि. हिंगोली रा. दक्षता नगर, कारवाडी ता. जि. हिंगोली. समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे फिर्याद देतो की, मी दिनांक 07.08.2023 रोजी 12.30 वा. अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे श्री विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, यांचेकडे मी लेखी तक्रार दिली होती की, मी दिनांक 11.05.2023 रोजी कर्तव्यावर असतांना माझे उजव्या पायास दुखापत झाल्याने मी वैदयकिय उपचार घेवून दिनांक 01.07.2023 रोजी कर्तव्यावर हजर झालो आहे. माझी दिनांक 11.05.2023 ते दि. 31.05.2023 पर्यंतची अर्जित रजा व दिनांक 01.06.2023 ते 30.06.2023 पर्यंत परावर्तीत रजा मंजुर करून देण्यासाठी श्री अरूण पवार, कार्यालयीन अधिक्षक, विभागीय वन अधिकारी वन विभाग हिंगोली यांना भेटलो असता त्यांनी माझी रजा मंजुर करून देण्यासाठी 30,000/- रू लाचेची मागणी केली असुन त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करावी अशी लेखी तक्रार दिली होती.

त्यांनतर पो.नि.श्री.विनायक जाधव ला.प्र.वि हिंगोली यांनी दोन शासकीय पंचाना ला.प्र.वि. कार्यालयात बोलावुन माझा परीचय त्यांना व त्यांचा परीचय मला करून दिला, हजर असलेले दोन पंच नामे श्री अमोल कैलास गिरी, अधिपरीचारक, जिल्हा सामान्य रूग्णालय हिंगोली व श्री मारोती किसन डोंगरे, अधिपरीचारक, सामान्य रूग्णालय हिंगोली असे असुन त्यांना मी दिलेली लेखी तक्रार दाखविण्यात आली होती.
त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या संबंधाने दिनांक 07.08.2023 रोजी तक्रार पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पंच क्र.01 गिरी यांचेसह श्री अरूण पवार, कार्यालयीन अधिक्षक यांची भेट घेण्या करीता विभागीय वनअधिकारी कार्यालय हिंगोली येथे भेट घेण्याकरीता गेलो असता श्री पवार, कार्यालयीन अधिक्षक यांची भेट झाली तेव्हा माझे कामासंबधी बोलणी करून मी त्यांना 30000/- जरा जास्त होतात थोड कमी करा असे म्हणालो असता श्री अरूण पवार यांनी त्यांचे टेबलवरील कागदावर 25000/- रू. आकडा लिहून दाखविला तेव्हा मी त्यांना 25000/- रू.तुन काहि तरी थोड फार कमी करा असे म्हणालो तेव्हा श्री अरूण पवार, कार्यालयीन अधिक्षक यांनी ''तिन एक कमी दया '' असे म्हणाले तेव्हा मी बावीस हजार जास्त व्हायलेत जावु दया आज किती देवू असे म्हणालो असता श्री पवार हे म्हणाले किती देणार... तेव्हा मी 15000/- रू म्हणालो असता श्री अरूण पवार यांनी 15000/- रू नरसींग यांचेकडे देण्याचे सांगीतले होते.

श्री अरूण पवार कार्यालयीन अधिक्षक यांनी माझी अर्जित रजा मंजुर करण्यासाठी 30000/- रू लाचेची मागणी करून तडजोडी अंती 22000/- रू लाच रक्कम स्वीकारण्याची सहमती दर्शवुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन 15000/- रू लाचेची मागणी करून उर्वरीत रक्कम काम झाले नंतर देण्याची सांगुन 15000/- लाच रक्कम स्विकारण्याची सहमती दर्शवीली आहे.

त्यावरून दिनांक 08.08.2023 रोजी पो.नि.श्री.विनायक जाधव ला.प्र.वि हिंगोली यांनी त्यांचे कार्यालयात सापळा पुर्व कार्यवाही दोन पंचासमक्ष करण्यात आली. त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 15,000/- रू. (500/- रू. चे 30 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी अँन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक मपोना योगीता अवचार लाप्रवि हिंगोली यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून दयावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर लाच स्विकारल्या नंतर डावे खिशातील हातरूमाल काढुन तोंड पुसून हातात धरावा असा ईशारा करावयाचा असल्याचे पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी मला पंचाना व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सुचना दिली.

त्यानंतर दिनांक 08.08.2023 चे 12.03 वा. दरम्यान मी पंच व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे श्री अरूण पवार, कार्यालयीन अधिक्षक यांना भेटण्यासाठी विभागीय वनअधिकारी, वन विभाग हिंगोली कार्यालया कडे रवाना झालो. तेव्हा माझी श्री अरूण पवार, कार्यालयीन अधिक्षक यांची विभागीय वनअधिकारी कार्यालय हिंगोली येथे भेट झाली. तेव्हा श्री अरूण पवार यांना सर... मी ते आणले होते सर सोबत सर देवुन टाकु का असे म्हणालो असता श्री अरूण पवार यांनी त्यांचे टेबलमधून एक पिवळया रंगाची फाईल काढून माझे समोर टेबलावर ठेवली व '' येच्यात टाक. असे म्हणाले तेव्हा मी त्यांना ''फाईल मध्ये न ''असे म्हणालो असता श्री अरूण पवार यांनी हो म्हणाले त्यानंतर मी लाचेची रक्कम 15000/- रू फाईल मध्ये ठेवली त्यानंतर श्री पवार यांनी ती पिवळी फाईल हातात घेवून त्यांचे टेबलचे कप्यात ठेवतांनी नोटांची हाताळणी केली तेव्हा मी त्यांना पंधरा हयत सर मोजुन घ्या सर बाकीचे सर पगार झाल्यावर देतो असे म्हणालो असता श्री पवार यांनी ''बाकी किती देता असे म्हणाले तेव्हा मी त्यांना म्हणालो बाकी ठरलय ते देतो असे म्हणालो असता श्री पवार किती असे म्हणाले तेव्हा मी त्यांना म्हणालो कालच बोलले नं तुम्ही बावीस म्हणले पंचवीस मधुन तीन कमी केले न असे म्हणालो असता श्री पवार हे म्हणाले ''बरं झाल्यावर कर... काही अडचण नाही असे म्हणुन त्यांनी ती लाचेची रक्कम स्विकारून त्यांचे टेबलाचे कप्यात ठेवली त्यावरून मी सापळा पथकास लाच स्विकाल्याचा ईशारा केला. तेव्हा सापळा पथकाने श्री अरूण पवार यांना 12.41 वा. सुमारास विभागीय वनअधिकारी, वन विभाग हिंगोली येथे त्यांना ताब्यात घेवुन त्यांनी पिवळया फाईलमध्ये ठेवलेली लाचेची रक्कम 15000/-रू. त्याचेकडून जप्त केली. तसेच पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे व आरोपी लोकसेवक श्री अरूण पवार, कार्यालयीन अधीक्षक यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डमधे रेकॉर्ड करण्यात आले आहे.

तरी आरोपी लोकसेवक अरूण भाऊसाहेब पवार, कार्यालयीन अधिक्षक, विभागीय वनअधिकारी, वन विभाग हिंगोली यांनी त्याचे पदाचा दुरुपयोग करून त्यांना मिळणारे परिश्रमिका खेरीज 30000/- रू लाचेची मागणी करून तडजोडी अंती 22,000/- रू लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन 15000/- रू लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे.

माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे आज दिनांक 08.08.2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांना तोंडी सांगितली असून ती त्यांनी संगणकावर टंकलिखित केली असून माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही -

(विनायक जाधव)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली .

अशोक पंडीत चव्हाण
दक्षता नगर कारवाडी
ता. जि. हिंगोली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): PRAFULL HANUMANTRAO ANKUSHKAR
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): PI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VIKAS SHEKUJI PATIL
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN62686

पोलीस ठाणे अमलदार
पो. स्टे. हिंगोली (शहर)